**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः अजित केशव शिर्के,

वयः ५० वर्षे, व्यवसायः वाहन चालक,

राहणारः शेणवई, ता. रोहा, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए.एल. पवार यांच्यामार्फत :**

०१. ब–याच वर्षांपूर्वी मी माझे कामानिमित्त पोलीस स्टेशन, रोहा येथे गेलो होतो, त्यावेळी माझे ओळखीचे श्री. कदम यांचे सांगिण्यावरुन मी दस्तांवर सहया केल्या होत्या. सहया करण्यापुर्वी मी ते वाचले नव्हते.

०२. आता मला दि. ०३/१२/२०१३ रोजीचे तीन पंचनामे, दि. ०६/१२/२०१३ रोजीचे दोन पंचनामे व दि.११/१२/२०१३ रोजीचा एक पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझे सही आहे. परंतु त्या पंचनाम्यांमधील मजकुर मला माहिती नाही.

**साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

०३. मी अनंत अंकुश देशमुख यांना ओळखत नाही. मी इयत्ता नववी पर्यंत शिक्षण घेतले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला मराठी लिहीता वाचता येते.

०४. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०३/१२/२०१३ रोजी पोलीसांनी मला व दुसरा पंच अनंत देशमुख याला पंचनामा करण्याकरीता पोलीस स्टेशन, रोहा येथे बोलाविले होते, त्यावेळी पोलीसांनी आमचे समक्ष व्यक्ती नामे रविंद्र शांताराम मोरे, याचे नाव गावाची चौकशी त्याचेकडे केली होती, पोलीसांनी सदर व्यक्तीला त्याचे सहयांचे नमुने घ्यायचे आहेत असे सांगितले, त्यावरून तो सदर नमुने देण्यास तयार झाला, त्यावरून पोलीसांनी सहा प्रतीवर त्याचे हस्ताक्षर व सहयाचे नमुने माझे समक्ष घेतले होते, सदर प्रतींवर पोलीसांनी माझी पंच म्हणुन सही घेतली होती, त्या अनुशंगाने पोलीसांनी माझे समक्ष पंचनामा तयार केला होता, त्यानंतर मी व अनंत देशमुख याने पंचनाम्यावर सही केली होती.

०५. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०३/१२/२०१३ रोजी सकाळी १०.१५ ते १०.४५ वाजताचे दरम्यान पोलीसांनी मला व दुसरा पंच अनंत देशमुख याला अपुर्वा अमोल पाशिलकर व फिर्यादी अरविंद शंकर वाघ यांच्या कपाटांची व टेबलाचे ड्रॉवरची झडती घ्यायची आहे असे सांगितले होते, त्यावरुन आम्ही दोघे, आरोपी रविंद्र मोरे व पोलीस मिळुन एम.बी.मोरे फांउडेशन इमारत येथे गेलो होतो, सदर इमारतीमधील कार्यालयात गेल्यानंतर आरोपीने गुन्हयात वापरलेले रबरी शिक्के फिर्यादी अरविंद वाघ व खजिनदार अपुर्वा पाशिलकर यांचे कपाटात किंवा टेबलचे ड्रॉवर मध्ये ठेवलेले असतात असे सांगितले होते, त्यावरुन पोलीसांनी सदर कपाट व ड्रॉवरची झडती घेतली असता त्यात त्यांना काहीही मिळाले नव्हते, तेथे पोलीसांनी आमचे समक्ष सविस्तर पंचनामा तयार केला, त्यानंतर आम्ही त्यावर सहया केल्या.

०६. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०३/१२/२०१३ रोजी सकाळी

११.३० ते १२.४५ वाजताचे दरम्यान पोलीसांनी मला व दुसरा पंच अनंत देशमुख याला अपुर्वा अमोल पाशिलकर ही आरोपीने सहया केलेले कागदपत्र व ठराव बुक सादर करीत आहे, ते गुन्हयाचे कामी जप्त करावयाचे आहेत, असे सांगितले होते, त्यावरुन पोलीसांनी सदर पंचनाम्यामध्ये नमुद एकुण पंधरा वस्तु आमचे समक्ष जप्त केल्या होत्या, त्यावर पोलीसांनी आमच्या सहयाची लेबले लावून तेथे पंचनामा तयार केला होता, त्यांनतर आम्ही त्यावर सहया केल्या.

०७. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०६/१२/२०१३ रोजी सकाळी ०९.०५ वाजताचे दरम्यान पोलीसांनी मला व दुसरा पंच अनंत देशमुख याला पंचनामा करण्याकरीता पोलीस स्टेशन, रोहा येथे बोलाविले होते, त्यावेळी आरोपीने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ वाशी, नवी मुंबई येथे सव्वीस विद्यार्थ्यांचे बनावट आवेदनपत्र पाठविले होते, ते मागणी केल्याप्रमाणे प्रभारी विभागीय सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ वाशी, नवी मुंबई यांनी त्यांचेकडे अहवालासह बंद लिफाफयामध्ये पाठविले आहे, त्या अनुशंगाने पंचनाम्याकरीता आम्हाला तेथे बोलाविण्यात आले होते, पोलीसांनी आमचे समक्ष खाकी रंगाचा लिफाफा फोडुन त्यामधुन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ वाशी, नवी मुंबई यांचेकडील प्रभारी विभागीय सचिव यांची सही असलेले व सव्वीस मुलांची नावे असलेले पत्र त्यांचे आवेदन पत्रासह त्या लिफाफयामध्ये होते, सदर दिवशीचे पंचनाम्यामधील अनु.क्र. १ ते २६ मधील आवेदनपत्रे सदर लिफाफयामध्ये होती, त्यावर पोलीसांनी आमच्या सहयाची लेबले लावुन दिसल्या परिस्थितीप्रमाणे पंचनामा तयार केला, त्यानंतर आम्ही त्यावर सहया केल्या.

०८. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०६/१२/२०१३ रोजी पोलीसांनी मला व दुसरा पंच अनंत देशमुख याला शिवाजी शंकर इरकर यांचे सहयाचे नमुने घेण्याकरीता पंचनामा करण्याकरीता पोलीस स्टेशन, रोहा येथे बोलाविले होते, त्यानंतर शिवाजी शंकर इरकर यांना पोलीसांनी त्यांचे सहयाचे नमुने घेण्याचे कारण समजावुन सांगुन सहा प्रतींमध्ये त्यांचे सहयाचे नमुने त्यांचे समंतीने पोलीसांनी आमचे समक्ष घेतले होते, सदर नमुन्यांच्या प्रत्येक दस्तावर आम्ही पंच म्हणुन सहया केल्या होत्या, त्या अनुशंगाने पोलीसांनी आमचे समक्ष पंचनामा तयार केला, त्यानंतर आम्ही त्यावर सहया केल्या होत्या.

०९. हे म्हणणे खरे नाही की, दि.११/१२/२०१३ रोजी सकाळी ११.१५ वाजताचे दरम्यान पोलीसांनी मला व दुसरा पंच अनंत देशमुख याला आरोपी रविंद्र मोरेची पत्नी सौ. नम्रता मोरे ही तिची मुलगी कु. सोजवल मोरे हिची मार्क लिस्ट पोलीस स्टेशनला हजर केली असून ती जप्त करण्याच्या अनुशंगाने पंचनामा करण्याकरीता पोलीस स्टेशन, रोहा येथे बोलाविले होते, त्यानंतर सौ. नम्रता मोरे हीने तिची मुलगी कु. सोजवल हिची जे.एन.राठी स्कुल अॅण्ड जुनिअर कॉलेज येथील ज्युनिअर के.जी. मधील प्रगती पुस्तक हजर केले. त्यावर आरोपीने पालक म्हणुन सहया केलेल्या होत्या, सदर प्रगती पुस्तक पोलीसांनी आमचे समक्ष ताब्यात घेउन सिलबंद केले, त्या अनुशंगाने त्यांनी आमचे समक्ष पंचनामा तयार केला, त्यावर आम्ही सहया केलया होत्या.

१०. हे म्हणणे खरे आहे की, मी सामान्यपणे कुठल्याही दस्तावर तो वाचल्याशिवाय सही करीत नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, पोलीस श्री. कदम ओळखीचे असल्यामुळे त्यांनी सहया केलया होत्या, हे म्हणणे खरे नाही

की, मी आरोपीला ओळखतो, तो माझा मित्र आहे त्यामुळे मी त्याला वाचविण्याकरीता आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. एम.एन. शिंदे यांचेमार्फत सुरू.**

११. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस श्री. कदम माझे चांगले परीचयाचे आहेत, पोलीसांनी एकाच दिवशी सर्व पंचनाम्यावर माझ्या सहया घेतल्या होत्या.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.03.20 17:12:54 +0530

स्थळ : रोहा.
(एस. एस. महाले)

दि.२०.०३.२०२५.
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.